**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक **२०.०१.२००९** रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अक्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २३८५ / पुणे | श्री.संभाजी सिताराम गायकवाड मु.करंजेपूल, पो.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बारामती, जि.पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.पुणे | सोमेश्वर विद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था यांच्याकडे सभासद शिक्षकांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने पूर्ततेचा अहवाल व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती | अपीलकर्त्यास १५ दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केलेआहे. |
| २ | २५८० / पुणे | श्री.पंकज बबन निंबाळकर मु.पो.लासूर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे | कार्यकारी संचालक, श्री.छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. भवानीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे | प्रादेशिक सहसंचालक (साखर), शिवाजीनगर, पुणे-५ | दि.१ जुलै २००६ ते माहे एप्रिल २००८ या कालावधीतील साखर विक्री दरासंबंधी एकूण ५ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्यास १ महिन्याच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केलेआहे. |
| ३ | २५६२ / पुणे | श्री.सुरिंदरपाल सी.सेठ ८८, शहाणी सुजण पार्क, लुल्लानगर, पुणे-४० | प्राचार्य, सरदार दस्तुर बॉईज स्कूल, तारापूर रोड, पुणे -१ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे | पालकसभेचे इतीवृत्त, शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या तिमाही | अपीलकर्त्यास सदर माहिती दि.३१.०१.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अहवालाची प्रत | प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २५६४ / पुणे | श्री.सुरिंदरपाल सी.सेठ ८८, शहाणी सुजण पार्क, लुल्लानगर, पुणे-४० | प्राचार्य, सरदार दस्तुर बॉईज स्कूल, तारापूर रोड, पुणे -१ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे | सरदार दस्तुर बॉईज स्कूल मधील रिक्त पदांच्या व भरतीच्या अनुषंगाने एकूण सहा मुद्यांची माहिती | अपीलकर्त्यास सदर माहिती दि.३१.०१.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २६२० / पुणे | श्री.सुधाकर दत्तात्रय दिक्षीत फ्लॅट क्र.४९, ठक्कर पार्क, सुरक्षानगर, विंग नं.२, हडपसर, पुणे-२८ | माहिती अधिकारी तथा चिटणीस जिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा | निवासी उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा | महाराणी सईबाई भोसले सहकारी हौ.सो.लि.,लोणंद, जि.सातारा या संस्थेमध्ये आपल्या मुलीस भूखंड मिळण्याबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ६ | २४६६ / पुणे | श्री.बबन सूद खोपडे मु.पो.पोम्बडी, ता.भोर, जि.पुणे | गट विकास अधिकारी , ता.भोर, जि.पुणे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, पुणे | मौजे पोम्बडी, ता.भोर,जि.पुणे येथील गावचे उत्तरेस महादेवाचे मंदिरा सभोवती २०० बाय २०० फुट लांबी रुंदीच्या जागेची नोंद फेरफार नं.३२८ ने झालेली आहे. या जागेच्या मालकाचे नाव व ती कोणाच्या ताब्यात आहे व या फेरफाराची नोंद कोणत्या कागदपत्राच्या आधारे झाली याबाबतची माहिती | अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ०६ अपिले (क्रमांक २३८५, २५८०, २५६२, २५६४, २६२० व २४६६ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले आहे असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मुदतीनंतर एक आठवड्यात आयोगाला अहवाल सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७ -०२-२००९**

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४था मजला, विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१.

दूरध्वनी क्र. ०२०_२६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२०_२६०५०६३२


**क्रमांक :अपील-२४७३**

दिनांक : १७.०२.२००९

प्रति,

श्री. दिलीप ज्ञानोबा देवकर
५४५, घोरपडे पेठ, पुणे ४२

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत..

महोदय,

आपण दि.२४.०७.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता खालील कारणास्तव दाखल करुन घेण्याच्या मुद्दयावर सुनावणीपूर्वीच अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपण मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची वैद्यकीय संदर्भातील खाजगी स्वरुपाची आहे. त्यात सार्वजनिक हिताचा विषय नाही. ही बाब, तसेच पूना हॉस्पिटल यांनी दिलेले दि.१५.०५.२००८ चेउत्तर लक्षात घेता आपले अपील निकाली काढण्यात येत आहे.

आपला,

(स्वाक्षरी) १७/०२

( रा. म. गेंगजे )
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
महाराष्ट्र पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

क्र. पुणे/अपील/२५२४/२००८
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१
फोन क्रं. : २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दि.१२ - २-२००९

प्रति,

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,
प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुणे-६

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा
यांचा दि. ५.११.२००८ चा तक्रार अर्ज

महोदय,

२/- सोबत श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा, १४, मोतीलाल तालेरा रोड, जि.पुणे यांचे राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले अपील पाठविण्यात येत आहे. अर्जदार यांनी दि. १८.१.२००८ चे इतिवृत्त व त्यावर केलेल्या कार्यवाहीची त्वरित माहिती देण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. २०.२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहे.

आपला

(स्वाक्षरी)

कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ

प्रत :

श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा, १४, मोतीलाल तालेरा रोड, जि.पुणे

२/- आपणास दि.१८.१.२००८ रोजीचे इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीची माहिती त्वरित देण्याबाबत कळविण्यात आले आहे. यास्तव आपला अर्ज सुनावणीपूर्वी निकाली काढण्यात आला आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहे.

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

क्र. अपील/ पुणे/२६२४ /२००८
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१
फोन क्र. : २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दि. २२-२-२००९

प्रति,

जन माहिती अधिकारी
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
श्री. मिलींदमाधव शरद वाबळे यांचा दि. ३.१२.२००८ चा अर्ज

महोदय,

२/- सोबत श्री. मिलींदमाधव शरद वाबळे, बी.जे.वैद्यकिय महाविद्यालय, पुणे यांचे अपील पाठविण्यात येत आहे. मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जाचे अनुषंगाने आवश्यक ती माहिती पंधरा दिवसाचे आत देण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. २७.२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा, माहिती न दिल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार शास्तीच्या कारवाईस आपण पात्र ठराल, याची नोंद घ्यावी, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहे.

आपला

कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ

प्रत :

श्री. मिलींदमाधव शरद वाबळे, प्राध्यापक, बी.जे.वैद्यकिय महाविद्यालय, पुणे
२/- आपले दि. ३.१२.२००८ रोजीच्या अर्जाप्रमाणे १५ पंधरा दिवसाच्या आत माहिती देण्याच्या सूचना दिल्या आहेत. यास्तव आपले अपील निकाली काढण्यात येत आहे, असे कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४था मजला, विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१.

दूरध्वनी क्र. ०२०_२६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२०_२६०५०६३२


**क्रमांक :अपील-२७७७/०९**

दिनांक : १७.०२.२००९

प्रति,

ॲड. अनिल भानुदास डांगे,
मारुती कॉम्पलेक्स, बिल्डिंग-सी,
फ्लॅट नं.२१, पिंपरी, पुणे -१७

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत..

महोदय,

आपण दि.०६.०१.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता मूळ दस्तासंबंधिची माहिती देण्यास माहिती अधिकाऱ्यास कळविले आहे. यास्तव आपले अपील निकाली काढण्यात येत असल्याबाबत मला आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गेंगजे )
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

Certified Copy
31.3.09

प्रत

१. दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, बिबवेवाडी, पुणे

२. मूळ दस्तासंबंधिची माहिती अर्जदारास आठ दिवसात देऊन अनुपालन अहवाल आयोगास दि.२५.०२.२००९ पर्यंत ~~आयोगास~~ सादर करावा.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २१-०८-२००८ व २२-०८-२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९७ / सातारा | सौ. रुक्मिणी प्रकाश नलगे दादर पोलीस लाईन, बि.नं.२, खो.नं. ५, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई -२८ | पोलीस निरीक्षक, खंडाळा पोलीस ठाणे, ता.खंडाळा, जि.सातारा | पोलीस अधिक्षक, सातारा, सातारा | श्रीम. आनंदीबाई मा. भोसले यांना दि. ०६-१-२००६ रोजी झालेल्या मारहाणी संदर्भात खंडाळा पंचायत समितीस दिलेली लेखी माहिती | अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| २ | ३०० / सातारा | चंद्रकांत केशव काशीद मु.पो. बरड, ता.फलटण, जि.सातारा | सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटण, ता.फलटण, जिल्हा सातारा | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था फलटण, ता.फलटण, जिल्हा सातारा | बरड सब यार्डा-वरील खर्च/ सेवेत असणारे नोकर/ जनावरांची छावणी इ. संदर्भात माहिती | अपीलकर्त्यास माहिती दिनांक १५-१०-२००८ पर्यंत देण्याचे सर्वानुमते ठरले, असे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ३०१ / सातारा | चंद्रकांत केशव काशीद मु.पो. बरड, ता.फलटण, जि.सातारा. | सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटण, ता.फलटण, जिल्हा सातारा | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था फलटण, ता. फलटण, जिल्हा सातारा | मौजे निबंळक येथील जनावरांची छावणी करीता झालेल्या जमाखर्चाची माहिती | अपीलकर्त्यास माहिती दिनांक १५-१०-२००८ पर्यंत देण्याचे सर्वानुमते ठरले, असे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ३०३ / सातारा | श्री. अमोल गजानन चंद रा. लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | गाव कामगार तलाठी, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे | तहसीलदार, हवेली, जि. पुणे | दिनांक २५-७-२००६ व दिनांक ३१-७-२००६ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबत माहिती | अपीलकर्त्यास एक महिन्यात माहिती देण्याचे सर्वानुमते ठरले, असे प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र एवढ्या मुदतीची गरज नाही. १५ दिवसात माहिती दिली गेली पाहिजे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ३५८ / सातारा | श्री. संजय मारुती निकम,<br>श्री. संजीव महादेव शिवदास<br>मु.पो.अपशिंगे(मि.), ता.जि.सातारा | सचिव, अपशिंगे वि.का.स.सेवा सोसायटी लि., पो.अपशिंगे(मि.), ता.जि.सातारा | सहायक निबंधक सहकारी संस्था, सातारा, जिल्हा सातारा | अपसिंगे वि.का.स. सेवा सोसायटीच्या सन २००४ ची माहिती | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाची आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ५ (क्र. २९७, ३००, ३०१, ३०३ व ३५८ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमाुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३-०२-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३५१ / सातारा | सौ. निर्मला जोतीराम पवार "अनुतेज", प्लॉट नं. १२, श्रीदत्त हौ. सोसायटी. न्यू विकासनगर (खेड), सातारा - ४१५००३ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत निरझे, ता.जावळी, जि.सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती मेढा, ता.जावळी, जि.सातारा | ग्रामपंचायत, निझरेस विविध योजनांतर्गत प्राप्त झालेला निधी, त्याचा जमाखर्च व केलेली विकासकामाची माहिती | अपीलकर्त्यास दिनांक २३-०१-२००८ व दिनांक ०४-०२-२००८ रोजी माहिती मिळाल्याची पोच जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. |
| २ | ३५७ / सातारा | श्री. अजय श्रीराम बापट ५६अ/१, केसरकर पेठ, सातारा - २ | मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा | आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे | उपसंचालक, नगर पालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक २३-३-०४ च्या परिपत्रकाची प्रत व ठराव क्र. १९५ संदर्भात माहिती | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने लेखी कळविले आहे. |
| ३ | ३८७ / सातारा | श्री. विष्णू जयसिंग चौधरी मु.पो.वडुज (कर्मवीरनगर, पेडगाव रोड), ता.खटाव, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, डाळमोडी, ता.खटाव, जि.सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा | जुना मिळकत क्र. १३१, १४१ व १४२ संदर्भात माहिती | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने लेखी कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ३ (क्र.३५१, ३५७ व ३८७ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३-०२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. संतोष रामचंद्र जगदाळे
मु.पो.पेडगाव, ता.खटाव, जि.सातारा. — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि.सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पेडगाव, ता. खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००८ |
| ३ | उपस्थित<br>**अपीलकर्ता** - गैरहजर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती खटाव, ता.खटाव, जि.सातारा<br>श्रीमती आय. व्ही. कोळी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत पेडगाव, ता.खटाव, जि. सतारा<br>श्री. समीर हजरत शेख | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे पेडगाव, ता.खटाव येथील ग्रामपंचायत मिळकती क्र.७२ (१), ७२(२), ७२९(१) ७२९(२), ७३०(१), ७३०(२), ७३० (३) इत्यादी मिळकतींच्या नोंदीबाबत | |

# विवेचन

मौजे पेडगाव, ता. खटाव या ग्रामपंचायतीकडील काही मिळकतींच्या नोंदीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.संतोष रामचंद्र जगदाळे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पेडगाव, ता.खटाव, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. तसेच काही भुखंडाच्या संदर्भात बिनशेती न करता बेकायदेशीर नोंदी करून बांधकामासाठी परवानगी कशी दिली, याची विचारणा श्री. जगदाळे यांनी या अर्जात केली होती. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पेडगाव यांनी ग्रामपंचायतीकडील माहिती दिली व जागेच्या मालकी हक्कासंबंधीचा विषय गाव कामगार तलाठी, पेडगाव व महसूल विभाग यांच्याशी संबंधित असल्याचे कळविले. त्याविरूध्द श्री. जगदाळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. त्याविरूध्द श्री. जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता सदर कार्यक्रमास गैरहजर होते. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पेडगाव श्री. समीर हजरत शेख व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव श्रीमती आय. व्ही. कोळी यांनी मूळ उत्तरामधील व मूळ निर्णयामधील तपशीलाचा पुनरूच्चार या कार्यक्रमातील प्रपत्रात केला.

गट नं.१०९५ मधील जागेच्या मालकी हक्काबाबत गाव कामगार तलाठी, पेडगाव व महसूल विभाग यांच्याशी संबंधित असल्यामुळे संबंधित कार्यालयाकडे दाद मागावी, हा निर्णय अपीलकर्ता यांनी मान्य केल्याचे व अपील निकाली काढल्याचे, तसेच ग्रामपंचायतीकडील माहिती पुनःश्च देत असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव श्रीमती आय. व्ही. कोळी यांनी नमूद केले. अपील निकाली काढण्यास श्री. जगदाळे यांनी मान्यता दिल्याचे इतिवृत्त श्रीमती आय. व्ही. कोळी यांनी सादर केले.

आयोगापुढील सुनावणीतही त्यांनी कागदपत्रांसह हेच निवेदन केले.

ग्रामपंचायतीकडील माहिती दिली असून जागेच्या मालकीच्या संदर्भातील कायदेशीरपणा /बेकायदेशीरपणा ठरविण्यासाठी अपीलकर्त्यास स्वतंत्र नियमावलीनुसार कार्यपध्दतीचा अवलंब करावा लागेल, असे सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २४.२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री घननीळ नामदेव भोसले
कुमठा नाका, श्रीरामनगर, प्लॉट नं ७
यशवंत हौसींग सोसायटी जवळ, सोलापूर

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** आरोग्य अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०७ / सोलापूर |
| २ | सुनावणी तारीख | दि. १९.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक आयुक्त (म),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री जी. आर. गोडबोले<br>**जन माहिती अधिकारी तथा** आरोग्य अधिकारी,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री डॉ. शहाजी यादव गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि --- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि २२.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि २१.०२.२००७ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>दि. १७.५.२००४ रोजी चौकशी अधिका-याने केलेल्या चौकशीकागदपत्राच्या नकला व अहवाल. | |

<u>**विवेचन**</u>

अपीलकर्ते श्री घननीळ नामदेव भोसले यांनी दि. २९.४.२००४ रोजी केलेल्या तक्रारी अर्जाच्या चौकशीसाठी दि. १७.५.२००४ रोजी अर्ज करून कागदपत्रांच्या नकला व अहवालाची मागणी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे केली होती. अपीलकर्त्यास काही माहिती दि १३.१२.२००७ रोजी देण्यात आली उर्वरित तसेच सबंधित प्रकरणी खातेनिहाय चौकशी चालू असून ती पूर्ण झाल्यावर त्याचा तपशील देण्यात येईल, असेही अपिलीय प्राधिकारी यांनी दि १५.१२.२००७ च्या निवेदनाव्दारे आयोगास कळविले. मात्र माहिती १० दिवसांत देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त (म), सोलापूर महानगरपालिका, यांनी दिला. कार्यालयातील लाकडी कपाटास वाळवी लागल्याने कागदपत्रे नष्ट झाल्याने अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली नसल्याचे व त्याबाबत अपिलकर्त्यास समक्ष परिस्थिती दाखवून खात्री पटविल्याचे दि. ३.१२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी यांनी आयोगास कळविले.

**आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :-**

<u>**आदेश**</u>

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ खातेनिहाय चौकशीबाबतची संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत नि:शुल पुरवावी, त्याबाबतचा अनुपालन अहवाल माहिती पुरवल्यापासून आठ दिवसांत आयोगास सादर करावा.

**पुणे**

**दि.२७.०२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २३-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४२ / सातारा | श्री.रघुनाथ भगवान इंजे रा.मु.पो.निढळ, ता.खटाव(वडूज), जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार, खटाव, जि.सातारा | तहसीलदार, खटाव, जि.सातारा | मंडल अधिकारी, खटाव यांच्या दिनांक २९-११-२००३ च्या अर्जावरील अहवालाची प्रत | तत्कालीन मंडल अधिकारी यांचा अहवाल १५ दिवसात देण्याचे एकमताने ठरले. |
| २ | ३८३ / सातारा | सौ. सुनिता प्रकाश पोळ प्लॉट ने. २४, कर्मवीर हौ.कॉलनी, राधिका पॅलेस रोड, तालुका पोलीस स्टेशन समोर, सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा. | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा | प्रा. आ. केंद्र म्हसवड - शालेय आरोग्य तपासणीचे अनुदान डॉक्टरांना न मिळाल्याबाबत, खर्चाचे देयकांच्या प्रती व प्रा.आ. केंद्रातील गॅस सिलेंडर चोरीसंदभातील पत्रव्यवहाराच्या प्रती | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ३९२ / सातारा | श्री.वसंत बजरंग ढफळे मु.पो. वजरोशी पाटण, जिल्हा सातारा | कार्यकारी अभियंता, बांधकाम(दक्षिण), सातारा जिल्हा परिषद, जिल्हा सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी सातारा जिल्हा परिषद, जिल्हा सातारा | पशुवैद्यकीय दवाखाना, मुरुड च्या बांधकामाची रक्कम व मिळालेली रक्कम यातील फरकाची रक्कम व त्यावरील व्याज मिळणे | अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ४ | ४०४ / सातारा | श्री. सुभाष बबनराव उर्फ आप्पासो जेबले कसबापेठ, पवार गल्ली, मु.पो.ता.फलटण | फलटण नगरपरिषद, फलटण, जि. सातारा | मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण, जि. सातारा | वृक्षकर व वृक्षसंवर्धन संदर्भात दिनांक ०१-०४-१९९० पासून दिनांक०१-०४-२००८ अखेर पर्यंतची माहिती | माहिती दोन दिवसात नि:शुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ४१० / सातारा | श्री. अंकुश चंद्रकांत कांबळे हुडको कॉलनी, रुम नं. ७७, फलटण, ता.फलटण, जि.सातारा | मृद सर्वेक्षण अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे | अधिक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे | पाल्याची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करणे | अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ६ | ४३३ / सातारा | सौ सुनिता प्रकाश पोळ प्लॉट नं २४, कर्मवीर हौसिंग कालनी, राधिका पॅलेस रोड, तालुका पोलीस स्टेशन समोर, सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा | अपीलकर्त्याच्या दिनांक १२-५-२००८ च्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीचा तपशील | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | ४३४ / सातारा | सौ सुनिता प्रकाश पोळ प्लॉट नं २४, कर्मवीर हौसिंग कालनी, राधिका पॅलेस रोड, तालुका पोलीस स्टेशन समोर, सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा | जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत व अनुषंगाने इतर माहिती | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु.क्र. १ ते ७ (क्र.४२, ३८३, ३९२, ४०४, ४१०, ४३३ व ४३४ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११-०२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २३-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री.वामन श्रीपती पानवळ सुमंगल नगर, कार्वेनाका, कराड, ता.कराड, जि.सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४२७ / सातारा | उप कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे-११ | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे-११ | भूमि अभिलेख विभागातील सेवा विचारात घेऊन वेतन निश्चिती करणेबाबत | वेतन निश्चिती झाली असल्याने अपील निकाली काढावे असे अपीलकर्त्याने लेखी कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०४-०२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम, रा. टेक्नीकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|
| १ | ४३५ / कोल्हापूर | अप्पर कोषागार अधिकारी (संगणक), जिल्हा कोषागार कार्यालय, कोल्हापूर | कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, कोल्हापूर | १ जून ते २० जून २००६ मध्ये प्राप्त भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या देयका संबंधात. |

अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम, रा. टेक्नीकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी (संगणक), जिल्हा कोषागार कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे १ जून ते २० जून २००६ मध्ये प्राप्त भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या देयका संबंधात माहिती दिनांक १२-०९-२००६ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. अप्पर कोषागार अधिकारी (संगणक), जिल्हा कोषागार कार्यालय, कोल्हापूर यांनी त्यांच्या दिनांक १०-१०-२००६ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहितीसाठी शुल्क भरण्यास कळविले. मात्र शुल्क भरण्यास पुरेसा कालावधी दिला नाही. अखेरच्या दिवशी शुल्क भरण्यास कळविले, त्यामुळे माहिती निःशुल्क हवी, परंतु त्यास, तसेच देऊ केलेली माहिती पाहू देण्यास जन माहिती अधिकारी यांनी नकार दिला आहे. विलंब १०० दिवसापेक्षा जास्त आहे. तसेच जोडपत्र-अ नुसार मुद्या क्र. इ, फ प्रमाणे कलम-४ नुसार कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे शास्ती व्हावी, असे दिनांक ११-११-२००८ रोजी प्रपत्रात अपीलकर्त्यांनी नमूद केले आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती तपशीलवार होती. ती १२३ पानांची आहे. माहिती तयार करुन अपीलकर्त्यास मुदतीमध्ये शुल्क भरण्याचे कळविले आहे. तथापि त्यांनी शुल्क न भरता निःशुल्क माहितीची मागणी केली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरणेबाबत अखेरच्या दोन दिवसात कळविले आहे, ते आधी कळविणे अधिक योग्य ठरले असते. परंतु विहित मुदतीत उत्तर दिले आहे, त्यानुसार अपिलकर्त्याने शुल्क भरणे आवश्यक होते. त्यासाठी पुरेशी मुदत न मिळाल्याचा दावा ग्राह्य मानता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३-०२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग हणमंत माने
मु.पो.मायणी, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादय आयुक्त,
सातारा विभाग, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सातारा विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.६.२००८ |
| ४ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** : श्री. पांडुरंग हणमंत माने<br>मु.पो.मायणी, ता.खटाव, जि.सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी**<br>यांचेतर्फे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड, लेखापाल | |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>ब्रम्हीभूत सद्‌गुरू यशवंतराव बाबा महाराज माने पाटील ट्रस्ट, मायणी या ट्रस्टच्या स्थापनेपासून आजतागायतची संस्थेच्या प्रोसीडिंग बुकाची नक्कल, बँक पासबुक, कॅशबुक, खर्चाच्या बिलाच्या पावत्या व इतर अनुषंगिक माहिती | |

## विवेचन

ब्रम्हीभूत सद्गुरू यशवंतराव बाबा महाराज माने पाटील ट्रस्ट, मायणी या विश्वस्त संस्थेच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. पांडुरंग हणमंत माने यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा यांच्याकडे मागितली होती. माहिती संस्थेशी संबंधित असल्यामुळे सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा कार्यालयाने हा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सचिव, ब्रम्हीभूत सद्गुरू यशवंतराव बाबा महाराज माने पाटील विश्वस्त ट्रस्ट, मायणी यांच्याकडे वर्ग केला व तसे श्री. माने यांना कळविले. विश्वस्तांनी माहिती न दिल्यामुळे श्री. माने यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांच्याकडे अपील केले. अध्यक्ष हे विश्वस्त-संस्थेचे अपिलीय प्राधिकारी असल्याचे नमूद करून सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाने हे अपील त्यांच्याकडे वर्ग केले. मागितलेली माहिती संदिग्ध व ती कोणत्या कारणासाठी हवी आहे हे नमूद नसल्यामुळे देता येत नसल्याचा निर्णय जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. त्यामुळे श्री. माने यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी संबंधित माहिती संस्था स्तरावरील असल्याचे व तसे संस्थेला कळविल्याचे प्रपत्रात नमूद केले. संस्थेचे सचीव श्री. दत्ता ग. माने व अध्यक्ष श्री. मोहन ऊर्फ भाऊसो पांडुरंग गुदगे हे कोणतीही माहिती देत नसल्याचे व दबाव आणण्याचे प्रयत्न करीत असल्याचे श्री. पांडुरंग माने यांनी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले.

उपरोक्त विश्वस्त संस्था स्थापन झाल्यापासून गेल्या दहा वर्षातील खर्चाच्या पावत्यांपासून कार्यवृत्तांतापर्यंतच्या प्रतींची मागणी श्री. माने यांनी केली आहे. श्री. माने व न्यासाचे विश्वस्त यांच्यामध्ये सहाय्यक धर्मादाय आयुक्तांपुढे व न्यायालयीन वाद असून काही प्रकरणे प्रलंबित आहेत. 'संबंधित बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे कागदपत्रे देता येणार नाहीत व त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी तुम्ही करीत आहात,' असे विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष श्री. मोहन ऊर्फ भाऊसो पांडुरंग गुदगे यांनी श्री. माने यांना दि. १८.८.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

विषय न्यायप्रविष्ट असल्याचा व अपीलकर्ता आणि संस्थेचे विश्वस्त यांचा वाद असल्यामुळे कागदपत्रे देता येत नसल्याचा जन माहिती अधिकारी श्री. द.ग.माने व अपिलीय प्राधिकारी श्री. गुदगे यांचा निर्णय अयोग्य आहे. मात्र अपीलकर्ता श्री. पांडुरंग माने यांनी मागितलेली माहिती विस्तृत आहे. हे लक्षात घेता त्यांना अभिलेखाचे अवलोकन करू देणे व आवश्यक त्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन देणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेकडून असे अवलोकन करू देण्याची व आवश्यक त्या प्रती पुरविल्या जाण्याची जबाबदारी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांची राहील.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित कागदपत्रांचे अवलोकन अध्यक्ष व सचीव, ब्रम्हीभूत सद्गुरू यशवंतराव बाबा महाराज माने पाटील ट्रस्ट, मायणी, ता. खटाव यांनी अपीलकर्त्यास करू द्यावे व आवश्यक ते शुल्क आकारून कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात. याबाबतची पूर्तता करून सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांनी आयोगास अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. २६.२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०२-२००९ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४९० / सातारा | श्री. नारायण मारुती भोसले द्वारा-श्री. वसंतराव कृष्णा बोडरे मु.पो.अहिरे, ता.खंडाळा, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिवाजीनगर, ता.खंडाळा, जि.सातारा | विस्तार अधिकारी (आयआरडीपी), पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | मौजे शिवाजीनगर येथील गावठाण मिळकत क्र.३०४, ३०४/१, ३०३, ३८६ व २०० चे उतारे, फेरबदलाचे ठराव व फेरबदलासाठी आधारभूत माहिती | अपीलकर्त्यास माहिती मिळाली. अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| २ | ४९१ / सातारा | श्री. सावळाराम बापूराव भोसले ५३, नागसेन निवास, आनंदनगर गृह निर्माण सहा. संस्था, फलटण, जि.सातारा | शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, जिल्हा सातारा | सौ. शेषाबाई सा. भोसले यांची वेतनवाढ व वेतन निश्चिती बाबत माहिती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| ३ | ४९३ / सातारा | श्री. शशिकांत महादेव जाधव मु.पो.कोडोळी, ता.जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोडोळी, ता.जि.सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा, जि.सातारा | विक्रांतनगर व चंदननगर येथील गटाराच्या बांधकामाच्या वर्क ऑर्डर, ठेकेदाराचे नाव, पेमेंट व चेक नंबर इ. च्या झेरॉक्स प्रती | अपीलकर्त्यास माहिती मिळाली. अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| ४ | ४९५ / सातारा | श्री. किसन नाथा आगवणे मु.पो.निंभोरे, ता.फलटण, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत निंभोरे, ता.फलटण, जि.सातारा | गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा | मिळकत क्र. १४० ची घरपट्टी सन २००५ पासून कोणत्या कायद्यान्वये घेतली जात नाही त्याबाबत माहिती | अपीलकर्त्यास माहिती चार दिवसात देण्याचे ठरले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ४९९ / सातारा | श्री.संभाजी आबाजी गाडे ३७१- अ, रविवार पेठ, पवार गल्ली, मु.पो.ता.फलटण, जिल्हा सातारा | निवासी नायब तहसीलदार फलटण, ता.फलटण, जि.सातारा | तहसीलदार फलटण, ता.फलटण, जि.सातारा | फलटण तालूका रेशनिंग दक्षता समितीशी संबंधित बाबींची माहिती | अपीलकर्त्यास माहिती मिळाली. अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| ६ | ५०२ / सातारा | श्री. विनायक श्रीकांत कोटणीस ६१, शुक्रवार पेठ, अनंत इंग्लिश स्कुल पुढे, सातारा-४१५००२ | कार्यासन अधिकारी, टी.पी.व्ही-१, नगर रचना कार्यालय, पुणे-१ | उप संचालक, नगर रचना कार्यालय, पुणे-१ | मंजूर आराखड्याचा नियम मिळणे, नियमबाह्य भाग दर्शवून मिळणे व वायूविजनाबाबत अभिप्राय मिळणे | अपीलकर्त्यास माहितीबाबत आठ दिवसात कळविण्याचे ठरले. |
| ७ | ५१९ / सातारा | डॉ. विक्रांत सदाशिव लाटे मु.पो. उब्रज, ता.कराड, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत उंब्रज, ता.कराड, जि.सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा | माहिती अर्जात नमूद केलेल्या ८ व्यक्तींच्या इमारत बांधकामाची माहिती | अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी सादर केली. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ७ (क्र.४९०, ४९१, ४९३, ४९५, ४९९, ५०२ व ५१९ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमाुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३-०२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०२-२००९ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४९७ / सातारा | श्री. लालासाहेब एम. साबळे पत्रकार, मु.पो.हणमंतवाडी, ता.फलटण, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पवारवाडी, ता.फलटण, जि.सातारा | विस्तार आधिकारी, पंचायत समिती, फलटण, ता.फलटण, जि.सातारा | सन २००६ ते आजअखेर (दि..१०.०७.२००८) झालेल्या ग्रामसभांची माहिती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. माहितीसाठी शुल्क भरून चलनाची प्रत सादर करताच माहिती अपीलकर्त्यास देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ४९८ / सातारा | श्री. लालासाहेब एम. साबळे पत्रकार, मु.पो.हणमंतवाडी, ता.फलटण, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिंदेनगर, ता.फलटण, जि.सातारा | विस्तार आधिकारी, पंचायत समिती, फलटण, ता.फलटण, जि.सातारा | सन २००० ते २००८ पर्यंत दारिद्र्यरेषेत समाविष्ट झालेल्यांची यादी, त्यांच्यासाठीच्या घरकुलांसंदर्भात व इतर १४ मुद्यांबाबत माहिती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. माहितीसाठी शुल्क भरून चलनाची प्रत सादर करताच माहिती अपीलकर्त्यास देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ५२६ / सातारा | डॉ. दिलीप सिताराम देशपांडे मालोजीनगर, कोळकी, ता. फलटण, जि.सातारा | प्र. सहायक सचिव, फलटण नगरपरिषद, ता.फलटण, जि.सातारा | मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद, ता.फलटण, जि.सातारा | फलटण नगरपरिषद हद्दीतील रविवार पेठेतील रेव्हीनी क्लब जवळील इमारतीच्या अनधिकृत बांधकामाबाबत | अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| ४ | ५३७ / सातारा | श्री. काशिनाथ नामदेव जाधव बी.आय.टी.चाळ नं.१९, रुम नं.६४, ३ रा मजला, केशवराम कदम मार्ग, मुंबई सेंट्रल, | चिटणीस, जिल्हाधिकारी, सातारा यांचे कार्यालय, जि.सातारा | निवासी उप-जिल्हाधिकारी, सातारा, जि.सातारा | श्री. बी. बी. भिल्लारे तलाठी, शिरवळ सजा यांच्याबाबत उपविभागीय अधिकारी, वाई तालुका, वाई यांनी जिल्हाधिकारी, | माहितीसाठी शुल्क भरून जाण्यास जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुदतीत कळविल्याचे व शुल्क भरल्यास माहिती देण्याचे प्रत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्याने आवश्यक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई-८ | | | सातारा यांना सादर केलेला चौकशी अहवाल, श्री. भिल्लारे यांचा जबाब व चौकशी दरम्यान पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती | असल्यास विहित शुल्क भरून माहिती घ्यावी. |
| ५ | ५७१ / सातारा | श्रीमती रेखा रमेश रोकड, मु.पो.लोणंद, (माळी आळी), ता.खंडाळा, जि.सातारा | सहायक अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., उपविभाग लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., फलटण विभाग, फलटण, जि.सातारा | विद्युत कनेक्शनबाबत | माहितीसाठी शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत कळविल्याचे, तसेच अपीलकर्त्याने विहित शुल्क भरले नसताही दिनांक ०२-१२-२००८ च्या पत्रान्वये माहिती अपीलकर्त्यास पाठविल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे.<br>जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरण्यास मुदतीत कळविले असल्याने अपीलकर्त्याने विहित शुल्क भरणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु. क्र. १ ते ५ अपिले (क्र.४९७, ४९८, ५२६, ५३७ व ५७१ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०-०२-२००९